# ५. जामीनपात्र व अजामीनपात्र

फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये गुन्ह्याचे ‘ जामीनपात्र ’ व ‘ अजामीनपात्र ’ असे वर्गीकरण दिलेले आहे. **जामीनपात्र गुन्ह्यात आरोपीला जामीन देणे तपासी अंमलदारास बंधनकारक आहे.** अजामीनपात्र गुन्ह्यामध्ये पोलीस जामीन देत नसून त्याबाबतचा निर्णय न्यायदंडाधिकारी/न्यायाधीश देतात.

(१) जामीनपात्र गुन्ह्यामध्ये अटक झाल्यानंतर आरोपीने लायक जामीन दिल्यास त्याला जामीनावर सोडणे आवश्यक आहे. अंमलदाराने आडकाठी केल्यास आरोपी किंवा त्याचे नातेवाईक संबंधित पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून तक्रार करू शकतात.

(२) अजामीनपात्र गुन्ह्यात आरोपीस २४ तासांच्या आंत संबंधित न्यायदंडाधिकारी/न्यायाधीशांसमोर हजर करणे आवश्यक आहे. त्यावेळेस आरोपी किंवा त्याचे प्रतिनिधी/वकीलामार्फत जामीनासाठी अर्ज करण्याचा आरोपीस अधिकार आहे. तसेच जर अटकेनंतर त्याला पोलिसांकडून मारहाण/त्रास झाला असल्यास, त्याला न्यायदंडाधिकारी/न्यायाधीशांपुढे तक्रार करण्याची संधी आहे.